# माहितीच्या अधिकाराच्या गैरवापरावर केंद्रीय माहिती आयोगाची भूमिका – चिकित्सक अभ्यास

**डॉ. सविता रविकांत रासम** एम.ए. एलएलएम., पीएच्.डी. **सहाय्यक प्राध्यापक,**
**शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर**

....................................................................................................

**गोषवारा –**

माहितीचा अधिकार परिनियम म्हणजे सार्वजनिक प्राधीकरणास नाहक त्रास देणे, वेठीस धरणे किंवा गैरप्रकाराने काही साध्य करण्याचे साधन नाही.

माहितीच्या अधिकार परिनियमाचा वापर नागरिकांनी सार्वजनिक हिताच्या दृष्टीने करणे गरजेचे होते. परंतु २०१२ नंतर शासकीय परिपत्रकांद्वारे सदर अधिनियमांवर अंकुश ठेवणे गरजेचे भासले. सदर परिनियमाबाबत प्रशासकीय यंत्रणेतही अज्ञान असलेने नाहक त्रास देणाऱ्या अर्जदारांची संख्याही वाढली. वारंवार तशाच प्रकारचा अर्ज करण्याचाही पायंडा पडू लागला. अर्जदारांकडून कायद्याचा गैरवापर तसेच प्रशासकीय यंत्रणेकडून कायद्याची अयोग्य अंमलबजावणी यामुळे केंद्रीय माहिती आयोगाने वेळोवेळी विविध अपिलांच्या निकालामध्ये गैरवापराबाबत योग्य मार्गदर्शन केले आहे त्याचा या लेखामध्ये सविस्तर खुलासा केला आहे.

---

**प्रस्तावना :**

आपल्याकडे येणारे नागरिक हे फार मोलाचे असून त्यांच्याकरिता प्रशासन आहे ते आपल्या कामामध्ये व्यत्यय नसून ते आपल्या कामाचा गाभा आहेत हे महात्मा गांधीचे उद्‌गार आधुनिक युगात बरोबर उलट दिशेने लागू होत आहेत. निव्वळ महाराष्ट्रात २०१० मध्ये माहितीसाठी अर्ज करणाऱ्यांची संख्या तब्बल ५ लाख ४८ हजार इतकी होती. (महाराष्ट्र टाईम्स, मंगळवार दि.२६ एप्रिल २०११).

माहितीच्या अधिकार अधिनियमातील कलम २५(४), नुसार राज्य माहिती आयोगाने राज्य विधी मंडळासमोर सादर केलेल्या अहवालानुसार सदर अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करणेकरिता प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणेबाबत स्पष्ट नमूद केले आहे. परंतु सार्वजनिक प्राधिकरणांनी कायद्याच्या जागरूकतेबाबत कोणतेही प्रभावी पाऊल न उचललेने अर्जदार या कायद्याचा गैरवापर करू लागल्याचे स्पष्ट दिसते.

माहितीचा अधिकार परिनियम २००५ प्रकरण तीन मधील कलम १२ मध्ये केंद्रीय माहिती आयोग घटीत करणेबाबत तरतूद आहे. कलम १२(२) नुसार केंद्रीय माहिती आयोग पुढील व्यक्तींचा मिळून बनलेला असेल, –

१) मुख्य माहिती आयुक्त आणि

२) आवश्यक वाटतील त्याप्रमाणे दहापेक्षा अधिक नसतील इतके केंद्रीय माहिती आयुक्त.

माहितीचा अधिकार परिनियम २००५ प्रकरण १२(४) अन्वये केंद्रीय माहिती आयोगाच्या कामकाजाचे सर्वसाधारण अधीक्षण, संचालन आणि व्यवस्थापन हे मुख्य माहिती आयुक्तांकडे निहीत असेल व त्याला माहिती आयुक्त साहाय्य करतील.

सबब केंद्रीय मुख्य माहिती आयुक्त श्री. मदाबुशी श्रीधर यांनी कायदेशीर व प्रभावीपणे विविध अपिलांचा निर्णय दिला असून त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. सदर निवडक अपिलातील निर्णयांचा सदर प्रबंधात उल्लेख केला आहे.

**संशोधनाचे उद्दिष्ट :**

माहितीच्या अधिकाराचा वापर नागरिकांकडून योग्य रितीने होत नसलेबाबत वारंवार निदर्शनास येत आहे. शासकीय कार्यालयातील अर्ज, माहिती आयुक्तांचे निर्णय, महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गत केलेले परिपत्रक याचा अभ्यास करून तसेच केंद्रीय माहिती आयोगाने विविध अपिलातील न्यायनिवाड्यातून कायद्यातील तरतुदींबाबत केलेल्या मार्गदर्शनातून सदर बाबतीत कायद्यातील विविध तरतुदींची योग्य अंमलबजावणी होणेकरिता सदरचे संशोधन सादर केले आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोध निबंधासाठी द्वितीय स्वरूपाच्या सामुग्रीचा आधार घेतलेला आहे. यामध्ये कायद्यातील तरतुदी, परिपत्रके, केंद्रीय माहिती आयोगाने दिलेले निर्णय, विविध अर्जातील संदर्भातून उपलब्ध सामुग्रीचा चिकित्सक अभ्यास करून निष्कर्षाची मांडणी केली आहे.

**सर्वोच्च न्यायालयाकडून माहिती अधिकार कायद्यास मजबुती :**

'डी.ए.व्ही. कॉलेज ट्रस्ट आणि व्यवस्थापन' या संस्थेस उच्च न्यायालयाने माहितीच्या अधिकार अधिनियमाखाली 'सार्वजनिक प्राधीकरण' असे घोषित केल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयातील अपिलात दिलेला खुलासा पुढीलप्रमाणे – सर्वोच्च न्यायालयाच्या दीपक गुप्ता आणि अनिरूध्द बोस या बेंचने माहितीच्या अधिकार अधिनियमाचा मूळ उद्देश सार्वजनिक कामकाजात पारदर्शकता आणि सार्वजनिक कामात खुलेपणा आणणे हा असून अशासकीय संघटना किंवा संस्था ज्यांना काही प्रमाणात वित्तपुरवठा केला जातो त्या ही या कायद्याच्या कार्यक्षेत्रात येतात असा स्पष्ट खुलासा केला आहे. जर नागरिकांचा पैसा शासनाकडून अशासकीय संघटनांना किंवा इतर संस्थाना काही कारणाकरिता मिळत असेल तर नागरिकांना सदर रक्कमेच्या विनियोगाबद्दल विचारणेचा हक्क व अधिकार आहे.

सदर प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने माहितीच्या अधिकार अधिनियमातील कलम २(ज) खालील 'सार्वजनिक प्राधीकरणाचा' अर्थ अधिक स्पष्ट करून सांगितला आहे. (टाईम्स ऑफ इंडिया, गुरूवार, १९ सप्टेंबर २०१९) एकीकडे न्याय यंत्रणा माहितीच्या अधिकार अधिनियमास वेळोवेळी बळकटी देत असताना नागरिक या कायद्याचा गैरवापर मोठ्या प्रमाणावर करत असल्याचे पुढील मुद्यांवरून स्पष्ट होईल.

**कायद्यातील तरतुदींच्या अनुषंगाने निदर्शनास आलेले काही ठळक मुद्दे :**

**१. अर्जदाराचे एका अर्जात एकापेक्षा जास्त विषय :**

शासकीय कार्यालयात अर्जदार एका अर्जात अनेक विषय नमूद करून कार्यालयास वेठीस धरतात. सदर बाबतीत शासनाने दि.१६ जानेवारी २०१२ रोजीच्या परिपत्रकाद्वारे पुढीलप्रमाणे नमूद केले आहे. माहितीच्या अधिकार अधिनियमाच्या कलम ६ अन्वये माहिती मिळण्यासाठीचा लेखी विनंती अर्ज एकाच विषयाशी संबंधित असावा आणि अर्जदाराला एकापेक्षा अधिक विषयांची माहिती हवी असेल तर तो त्याकरिता स्वतंत्र अर्ज करील. उदा. एका अर्जदाराने

राज्य जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल (विभागीय वनअधिकारी कार्यालय), सामाजिक वनीकरण विभाग यांना आपल्या विभागांतर्गत जिल्ह्यातील सर्व रेंजमार्फत रेंजनिहाय ३३ कोटी वृक्षलागवडीवर झालेल्या खर्चाचा लेखाजोखा, मंजूर देयके, वितरीत केलेले धनादेश / आरटीजीएस्, गुत्तेदारांची नावे, रोपे खरेदी, प्रतिरोपांची किंमत, कोणत्या नर्सरीतून घेतली त्याबाबत नर्सरी प्रमाणित असलेचे प्रमाणपत्र, चेक मेजरमेंट रिपोर्ट इ. माहितीच्या तपशीलाचा समावेश होता.

सबब, विभागीय कार्यालय शासकीय परिपत्रकाच्या आधारे सदरचा अर्ज निकाली काढू शकतो. परंतु कायद्याच्या अज्ञानामुळे वरिष्ठ अधिकारी उपलब्ध माहिती द्या असे नमूद करतात आणि विविध कार्यालयात या अर्जाबाबत संभ्रमावस्था निर्माण होते. तेव्हा सार्वजनिक प्राधिकरणांनी शासकीय परिपत्रकाचा अभ्यास करून कायद्याची योग्य अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

**२. व्यापक जनहिताशी संबंध नसलेली वैयक्तिक स्वरूपाची माहिती :**

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ८ (१) त्र मध्ये जी माहिती प्रकट करणेचा सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्तीच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप करील अशी वैयक्तिक तपशीलासंबंधातील माहिती देण्यापासून जन माहिती अधिकाऱ्यास सूट देणेत आलेली आहे.

सदर बाबतीत स्पेशल लिव्ह पिटीशन क्र. २७७३४/२०१२ गिरीश रामचंद्र देशपांडे वि. केंद्रीय माहिती आयोग या प्रकरणात दि.०३/१०/२०१२ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाआधारे तसेच श्री. एच्.ई. राजसरकारप्पा वि. राज्य जन माहिती अधिकारी (याचिका क्र. १०६६३/२००६) मध्ये उच्च न्यायालय कर्नाटक यांनी दिलेल्या निर्णयाआधारे दि.१७/१०/२०१४ च्या शासन परिपत्रकाद्वारे असे कळविणेत आले की, 'लोकहिताच्या दृष्टीने व्यापक जनहित साध्य न करणारी किंवा विशेषतः जी त्रयस्थ पक्षाबरोबर उद्‌भवलेल्या वैयक्तिक वादांच्या अनुषंगाने मागविलेली माहिती, माहितीच्या अधिकारात अर्जदारास देण्यात येऊ नये.'

**३. वारंवार त्याच माहितीबाबत मागणी करणारा अर्ज :**

अनेक शासकीय कार्यालयात काही अर्जदार वारंवार तीच माहिती मागणी करतात. सबब जगदीश कुमार कोळी वि. शालेय शिक्षण व साक्षरता विभाग एम्.एच्.आर.डी., भारत सरकार (CIC/SA/A/2015/001849) या अपीलात माहिती आयुक्तांनी स्पष्ट खुलासा केला आहे की वारंवार एकाच माहितीचा तपशील विचारू नये यातून शासकीय कार्यालयातील वेळेचा व कामाचा अपव्यय झालेचा निदर्शनास येतो तसेच सार्वजनिक प्राधीकरणांनी आपल्या कार्यालयाच्या वेबसाईटवर या बाबतीत स्पष्ट नमूद करावे की 'वारंवार तीच मागणी करणारे माहितीचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.'

**४. नाहक त्रास देऊन कामात व्यत्यय आणणारे अर्ज :**

अनेक सार्वजनिक प्राधिकरणांकडे एकाच अर्जदाराचे नाहक त्रास देणारे अर्ज कायम येतात त्याविषयी प्रा. एम्. श्रीधर आचार्युलु, केंद्रीय माहिती आयुक्त यांनी नारायण सिंग वि. डीटीसी, जी एन् सी टी डी (CIC/SA/A/2014/000543 आणि CIC/SA/A/2014/000603, CIC/SA/A/2014/001200, CIC/SA/A/2014/001384, CIC/SA/A/2014/001399, CIC/SA/A/2014/001439, CIC/SA/A/2014/000652 अशाही अपीलांमध्ये) पुढीलप्रमाणे निकाल दिला आहे. सदर अपीलकर्ते

सुनावणीवेळी गैरहजर राहतात. त्यांना सार्वजनिक प्राधिकरणाने माहिती दिली तरी ते वारंवार त्यांना नाहक त्रास देतात. सबब यामध्ये अपीलकर्ता सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामात व्यत्यय आणतो. सदर अपीलकर्त्याचे प्रकरण तयार करून सार्वजनिक प्राधीकरणांनी 'माहितीच्या अधिकार कायद्याचा गैरवापर' असा त्याच्या नावासमोर उल्लेख करून कार्यालयात सकृतदर्शनी ठळक भाषेत लावावे तसेच कार्यालयाच्या वेबसाईटवरही घोषित करावे.

**५. विशिष्ट तक्त्यात माहितीची मागणी :**

अनेक अर्जदार विशिष्ट तक्त्यात माहितीची मागणी करतात. सबब मधु भंडारी वि. दिल्ली विकास प्राधिकरण या अपीलात कलम ६(१) बाबत स्पष्टीकरण करताना केंद्रीय माहिती आयुक्तांनी विशिष्ट तक्त्यात माहिती मागितली असेल तर सार्वजनिक प्राधिकरणावर तशी देणे बंधनकारक नाही. उपलब्ध माहिती जशी आहे तशी पुरविणेबाबत निर्णय देणेत आला. तेव्हा सार्वजनिक प्राधिकरणांनी ओढून ताणून माहिती तक्त्यात तयार करणेची तसदी घेऊ नये.

**६. एखाद्या व्यक्तीचे जिवीत वा स्वातंत्र्य या संबंधातील माहिती विनंती अर्ज प्राप्त झालेपासून ४८ तासांच्या आत देणेचे तरतुदीबाबत :**

माहितीच्या अधिकार अधिनियमातील कलम ७(१) अन्वये अर्जदारास जिवीतास किंवा स्वातंत्र्यास धोका असेल आणि माहितीची त्वरित आवश्यकता असेल तर प्राधिकरणाने ती ४८ तासात अर्जदारास उपलब्ध करून दयावी अशी तरतूद आहे.

याबाबत शेखर सिंग आणि इतर वि. पंतप्रधान कार्यालय या अपीलात केंद्रीय माहिती आयुक्तांनी जर कलम ७(१) चा वापर केला तर तसा ठोस पुरावा प्राधीकरणाला सादर करणे आवश्यक आहे. तो पुरावा योग्य असेल तरच सार्वजनिक प्राधीकरणाने ४८ तासात माहिती पुरवावी अन्यथा कायद्यातील तरतुदीनुसार ३० दिवसात कार्यवाही करावी असा निर्णय दिला आहे.

**७. एखाद्या प्रकरणावर अद्याप कार्यवाही चालू असेल :**

जर अर्जदाराने मागणी केलेल्या माहितीच्या तपशीलातील प्रकरणावर अद्याप कार्यालयीन कार्यवाही पूर्ण झाली नसेल तर केंद्रीय माहिती आयुक्तांनी रविंदरकुमार वि बी.एस.बशी सह. पोलीस आयुक्त या अपीलात असे स्पष्ट सांगितले आहे की कार्यवाही सुरू असलेल्या प्रकरणाबाबत माहिती दिली तर त्याचा परिणाम प्रकरणावर होऊ शकतो. तरी सदर प्रकरणी संबंधित प्रकरणात अद्याप कार्यवाही सुरू असलेने माहिती पुरविता येत नाही असे कळविणे इष्ट ठरते.

**८. कलम ११ – त्रयस्थ पक्षाबाबत माहिती :**

केंद्रीय माहिती आयुक्तांनी कलम ११ चा काटेकोरपणे वापर करावा. त्रयस्थ पक्षाच्या माहितीबाबत संबंधिताची हरकत / ना हरकत घेऊनच अर्जावर योग्य तो निर्णय घ्यावा असे जार्ज पॉल वि. बी.एस्.एन्.एल. या अपीलामध्ये नमूद केले आहे.

**निष्कर्ष :**

**१. कायद्याच्या ज्ञानाचा अभाव :**

माहितीच्या अधिकारातील तरतुदी, वेळोवेळी प्रसिध्द झालेली शासकीय परिपत्रके यांचे नागरिकांना अज्ञान असलेने सदर कायद्याखाली अर्जदार वारंवार अर्ज करून प्राधिकरणास वेठीस

धरतात. कायद्याचा योग्य वापर झाल्यास सदर कायद्याचे उद्दिष्ट सफल होऊन सजग समाजाचा शासकीय कामकाजात सक्रीय सहभाग वाढेल.

**२. निवडक अर्जदारांच्या हातातील साधन :**

माहितीच्या अधिकार अधिनियमाचा वापर काही निवडक व्यक्तीच स्वहितासाठी वारंवार करताना दिसतात. ही बाब शासनाच्या निदर्शनास येताच महाराष्ट्र शासनाने आपले परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०१२/९८९/प्र.क्र.४७९/सहा. मंत्रालय मुंबई – ४०००३२ दि. १७ ऑक्टोंबर २०१४ याद्वारे संबंधित अर्जाबाबत माहिती पुरविण्याचे बंधन नसलेबाबत खुलासा केला आहे.

**३. वैयक्तिक माहिती मागणेवर अर्जदारांचा भर :**

सदर कायद्याखाली अनेक अर्जदार अधिकाऱ्यांची वैयक्तिक माहिती मागतात. उदा. शासकीय कर्मचारी / अधिकारी यांस त्याच्या सेवकासंबंधित मिळालेली ज्ञापने, नोटीस, शिक्षादेश,अहवाल, सेवा, त्याच्या चल/अचल संपत्तीची माहिती इ. सबब माहितीचा अधिकार परिनियम २००५ कलम ८(त्र) नुसार वैयक्तिक माहिती ज्यामध्ये जनहित नाही अशी माहिती देणेचे बंधन जनमाहिती अधिकाऱ्यावर नाही.

**४. प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचे दबावतंत्र :**

सदर कायद्यात जन माहिती अधिकाऱ्याने अर्ज प्राप्त दिनांकापासून ३० दिवसांत अर्जदाराला कळविणे गरजेचे आहे. जन माहिती अधिकारी याबाबत प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांशी चर्चा करतात व आपले मत मांडतात. परंतु वरिष्ठांकडून जनमाहिती अधिकाऱ्यांवर माहिती देणेबाबत दबाव येतो. अशा प्रकाराने जनमाहिती अधिकाऱ्यास कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीपासून वरिष्ठ वंचित ठेवतात. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनीही कायदा, शासकीय परिपत्रके, माहिती आयुक्तांचे निर्णय इ. बाबींचा सखोल अभ्यास करून समन्वयाने मार्गदर्शन करणे गरजेचे आहे.

**शिफारशी :**

**१. कायद्याचा योग्य वापर :**

नागरिकांनी कायद्याचा योग्य वापर करून प्रशासनात खुलेपणा आणणेचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. तसेच योग्य वापराने कायद्याची पायमल्ली होणार नाही.

**२. कार्यालयीन कागदपत्रे व्यवस्थित जतन करणे गरजेचे :**

शासकीय कार्यालयात कामकाजाच्या कागदपत्रांविषयी गलथान कारभार आढळून येतो. शासकीय कार्यपूर्ती झाली तरी कागदपत्रांचे योग्य रित्या जतन केले जात नाही. त्यामुळे सार्वजनिक प्राधीकरणांनी कार्यालयीन कागदपत्रे व्यवस्थित जतन करणे काळाची गरज आहे.

**३. नाहक त्रास देणाऱ्या अर्जदारावर कायद्याने अंकुश :**

माहितीच्या अधिकार परिनियमात नाहक त्रास देणाऱ्या अर्जदारांवर कायद्याने अंकुश ठेवणेची तरतूद होणे काळाची गरज आहे तरच कायद्याचा योग्य अवलंब होईल.

**४. गैरवापरामुळे कायदा त्रासदायक आहे असे मत :**

माहितीच्या अधिकार अधिनियमाचा उद्देश राज्यकारभारात पारदर्शकता आणणे असून नागरिकांच्या सदर कायद्याच्या गैरवापरामुळे कायदाच त्रासदायक आहे असा गैरसमज निर्माण झाला आहे. सबब अर्जदारानी कायद्याचा वापर योग्य रितीने करावा.

**५. समन्वयाचा अभाव :**

सार्वजनिक प्राधीकरणांनीही कार्यालयात समन्वय साधून कायद्याच्या तरतुदींची योग्य अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कार्यालयातील सर्वांनी या कायद्याच्या अंमलबजावणीबाबत सक्रीय सहभागी होणेस प्रोत्साहन दयावे.

**६. मार्गदर्शन / प्रशिक्षणाची आवश्यकता :**

सार्वजनिक प्राधीकरणांनी सदर कायद्याबाबत कार्यालयास सखोल ज्ञान प्राप्त होणेबाबत कार्यशाळा, प्रशिक्षण, शिबीरांचे आयोजन करणे गरजेचे आहे त्यामुळे सदर कायद्याची भिती नाहीशी होऊन प्रशासनास प्रभावीपणे सदर कायद्याची अंमलबजावणी करता येईल.

**७. सार्वजनिक हिताच्या दृष्टीने कमी प्रमाणात कामगिरी :**

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नागरिकांचा शासन कारभारातील सहभाग वाढवणे या उद्देशाने अस्तित्त्वात आला. परंतु नागरिकांना कायद्याच्या सार्वजनिक हिताच्या दृष्टीने वापर न करता वैयक्तिक माहितीची मागणी करणे, वारंवार तीच माहिती मागणे, नाहक त्रास देणे, प्रशासनास वेठीस धरणे यावर भर दिलेने कायद्याबाबत सार्वजनिक हिताच्या दृष्टीने भरीव कामगिरी झालेचे दिसून येत नाही.

**८. कारण विचारणे गरजेचे :**

महाराष्ट्र माहितीच्या अधिकार अधिनियमाखाली अर्जदाराने अर्जात कारण नमूद करणे बंधनकारक होते. त्यामुळे महाराष्ट्रात या कायद्याची प्रभावी वापर व अंमलबजावणी झालेचे दिसते. सबब केंद्रीय कायद्यात कारणाची तरतूद नसलेने अर्जदार कायद्याचा गैरवापर मोठ्या प्रमाणात करताना दिसत आहेत.

**९. प्रभावी व ज्ञानी मुख्य माहिती आयुक्त :**

शासनाचे वरिष्ठ अधिकारी निवृत्तीनंतर सरकारतर्फे मुख्य माहिती आयुक्त म्हणून निवडले जातात. सदर आयुक्तांचे कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणेकडे दुर्लक्ष होत असलेने कायद्याचे योग्य ज्ञान व वापर करणाऱ्या व्यक्तींचीच मुख्य माहिती आयुक्त म्हणून निवड व्हावी. माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम १२(५) अन्वये केंद्रीय मुख्य माहिती आयुक्त व माहिती आयुक्त तसेच कलम १५(५) अन्वये राज्य मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त हे, कायदा, विज्ञान, समाजसेवा, व्यवस्थापन, पत्रकारिता, जनसंपर्क माध्यम किंवा प्रशासन आणि शासन या विषयांचे व्यापक ज्ञान व अनुभव असलेल्या, सार्वजनिक जीवनातील प्रख्यात व्यक्ती असतील अशी तरतूद असूनही शासन प्रभावी व ज्ञानी माहिती आयुक्तांची नेमणूक करत नसलेने कांही अपीलांचे निर्णय चुकीचे दिले जातात. सबब, शासनाने माहिती अधिकार परिनियम २००५ मधील विविध कलमांची योग्य अंमलबजावणी करावी.

तात्पर्य, माहिती अधिकार अधिनियम २००५ अंमलात येऊन १४ वर्षे पूर्ण झाली आहेत. सदर कायद्याखालील माहितीने सर्व सार्वजनिक प्राधीकरणांच्या कामकाजात पारदर्शकता, उत्तरदायित्व व लोकसहभाग वाढून सुप्रशासनाच्या दिशेने वाटचाल होणे ही काळाची गरज आहे.

**संदर्भसूची :**

१. कायदा माहितीचा अन् अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा – प्रल्हाद कचरे व शेखर गायकवाड, यशदा.
२. महाराष्ट्र शासन परिपत्रके
३. वनविभागातील अर्जातील तपशील
४. www.cic.gov.in
५. RTI Use & Abuse - Prof. Madabhushi Sridhar - Central Information Commissioner - Allahabad Law Agency